# जनसंपर्क विभाग

जळगाव दि. १२ (प्रतिनिधी) जीवनात यशस्वी होण्याचा कोणताही शॉर्टकट नसतो. कष्ट घ्यावेच लागतात कारण कष्टाशिवाय गुणवत्ता प्राप्त होत नाही. तेव्हा विद्यार्थ्यांनी कॉपी करण्याची मानसिकता सोडून द्यावी. त्यामुळे भविष्यातील मोठे नुकसान टळेल असे प्रतिपादन कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, विद्यार्थी विकास विभागाव्दारे जागतिक युवा दिनाचे औचित्य साधुन कुलगुरू संवाद यात्रेला प्रारंभ करण्यात आला. जळगाव येथील डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालयात या कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. यावेळी कुलगुरूंनी पहिल्या टप्प्यात विद्यार्थ्यांशी तर दुस-या टप्प्यात प्राध्यापकांशी संवाद साधला.

विद्यार्थ्यांशी संवाद साधतांना कुलगुरू प्रा. माहेश्वरी म्हणााले की, विद्यार्थ्यांनी ज्ञान आणि माहिती यातील फरक समजून घेणे आवश्यक आहे. शिक्षण हे मेंदूला समृध्द करते. त्यामुळे अवलोकन, विश्लेषण आणि आकलन क्षमता वाढीला लागते. त्यातुनच नवसंकल्पनांना चालना मिळून नवउद्योजक जन्माला येतात. देशात आज घडीला एक लाखांपेक्षा अधिक नवउद्योजक तयार झाले आहेत. यातील ४० टक्के ग्रामीण भागातील आहेत. नवीन शैक्षणिक धोरण हे संकल्पनाधिष्ठीत आहे. बदल स्वीकारल्याशिवाय आपली प्रगती होणार नाही. आचार, विचार, व्यवहार, वागणूक यामध्ये अनुशासन हवे. अनुशासन हा आपल्या स्वत:मधील व आपल्या ध्येयामधील पूल आहे. वेळेचे महत्व ओळखावे. चांगल्या मित्रांचे नेटवर्क तयार करावे असे आवाहन करतांना कुलगुरूंनी विद्यापीठाच्या विविध योजनांची माहिती दिली. परीक्षेत कॉपी करू नका असेही यावेळी त्यांनी सांगितले, विद्यार्थ्यांनी विचारलेल्या शंकाचे कुलगुरूंनी निरसन केले.

दुस-या टप्प्यात कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांनी प्राध्यापकांशी संवाद साधला. विद्यापीठ परीक्षा, ऑनलाईन स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, विद्यार्थ्यांची उपस्थिती, विद्यार्थ्यांची व शिक्षकांची आजची प्रतिमा व मानसिक अवस्था याबाबत त्यांनी आपल्या मनोगतात प्रकाश टाकला. प्राध्यापकांच्या प्रश्नाचीही उत्तरे त्यांनी दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी केले. अध्यक्षस्थानी लेवा एज्युकेशनल युनियनचे सहसचिव प्रा. व. पु. होले होते. प्राचार्य डॉ. गौरी राणे यांनी स्वागतपर भाषण केले. या कार्यक्रमास व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. सुरेखा पालवे उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. सुजाता गायकवाड व डॉ. सत्यजित साळवे यांनी केले. प्रा. नितााली अहिरे यांनी आभार मानले. सृती मराठे या विद्यार्थिनीने महापुरूषांच्या कार्याला उजाळा दिला.

**बातमी क्रमांक २**

जळगाव दि. १२ (प्रतिनिधी) डेटा सायन्सचे महत्व सर्व क्षेत्रांमध्ये वाढीला लागले असून यामध्ये रोजगाराच्या मोठ्या संधी आहेत. मात्र त्यासाठी विश्लेषण क्षमता विकसित करण्याची गरज आहे असे प्रतिपादन राष्ट्रीय सांख्यिकी आयोगाचे अध्यक्ष राजीव करंदीकर यांनी संख्याशास्त्र विभागाच्यावतीने आयोजित राष्ट्रीय कार्यशाळेचे उद्धाटन करतांना केले. त्यांनी या कार्यशाळेला ऑनलाईन संबोधित केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या गणितशास्त्र प्रशाळेतील संख्याशास्त्र विभागाच्यावतीने दि. १२ व १३ जानेवारी रोजी “डाटा सायन्स ॲण्ड ॲपलाईड स्टॅटस्टिक्स” या विषयावर राष्ट्रीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली असून या कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. करंदीकर यांच्या हस्ते झाले. त्यांनी उपस्थितांना ऑनलाईन संबोधन केले. ते आपल्या भाषणात म्हणाले की, भारतात डेटा सायन्सचे मागणी वाढली आहे. सर्व क्षेत्रांच्या विश्लेषणासाठी डेटा सायन्स महत्वाचे आहे. यामध्ये करिअर करणा-या विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणावर

उपलब्ध आहेत. डेटा सायन्समध्ये कोणते मोड्युल वापरले जाते हे महत्वाचे आहे, अन्यथा निष्कर्ष चुकीचे निघू शकतात. साधने आणि तंत्र महत्वाचे आहेत. या क्षेत्रात विश्लेषण क्षमता विकसित केली जावी असे आवाहन त्यांनी केले.

प्रमुख पाहूणे म्हणून बोलतांना माजी कुलगुरू डॉ. के. बी. पाटील म्हणाले की, डेटा सायन्समध्ये संख्याशास्त्र हे महत्वाचे आहे. सर्व क्षेत्रांमध्ये डेटा सायन्स आता गरजेचे झाले आहे. केवळ पदवी प्राप्त करण्यापूरते शिक्षण न घेता विचार आणि विश्लेषण करण्याची सवय लावून घेण्याचे आवाहन त्यांनी केले. परिश्रम आणि प्रामाणिकपणा याशिवाय भविष्यात कोणताही पर्याय नाही असेही डॉ. के. बी. पाटील म्हणाले. वडोदराच्या महाराजा सयाजीराव विद्यापीठातील गणिततज्ज्ञ डॉ. के. मुरलीधरन आपल्या भाषणात म्हणाले की, संख्याशास्त्राशिवाय तुम्ही डेटा सायन्समध्ये पुढे जावू शकत नाही. सांख्यिकी सिध्दांतावर फोकस करण्याचे आवाहन यावेळी त्यांनी केले. गणितशास्त्रातील शिक्षकांनी येणा-या बदलांना सामोरे जाण्याची तयारी ठेवावी असेही आवाहन डॉ. मुरलीधरन यांनी केले.

प्रारंभी संख्याशास्त्र विभागप्रमुख डॉ. आर. एल. शिंदे यांनी प्रास्ताविक केले. पाहूण्यांचा परिचय प्रा. किर्ती कमलजा व प्रा. मनोज पाटील यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मधुजा शिंदे यांनी केले. डॉ. आर. डी. कोष्टी यांनी आभार मानले. यावेळी मंचावर गणितशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. एस. आर. चौधरी उपस्थित होते. या कार्यशाळेत देशातून ७५ जण सहभागी झाले आहेत.

**बातमी क्र. ३**

जळगाव दि. १२ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्र प्रशाळेत राजमाता माँ जिजाऊ साहेब व स्वामी विवेकानंद जयंती निमित्ताने अभिवादन करण्यात आले.

प्रशाळेचे प्रभारी प्रा. अजय पाटील यावेळी बोलतांना म्हणाले की, जिजाऊ आणि विवेकानंद यांचे विचार विद्यार्थ्यांनी आत्मसात करून त्यांच्या कार्यातून प्रेरणा घ्यावी. डॉ. विजय घोरपडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. दामिनी पाटील हिने आभार मानले.

……………………………………………………………………………………………………………

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १२ जानेवारी, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी